# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०२/०४/२०१९
## दि.०१/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ३०६/१९,भादविक ३९२,५०६,३४ |
| **फिर्यादी** | सुर्यकांत भुनिया,वय-१९ वर्षे,रा.शिवनेरीनगर कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/०३/२०१९ रोजी २३/१५ वा. कुबेरा कॉलनीचे गेट जवळ एन.आय.बी.एम. रोड,कोंढवा-खुर्द पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र दिपक मिद्दा याचेसह पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी व साक्षीदार यांना मारण्याची धमकी देऊन फिर्यादी यांचे पाकिटातुन जबरदस्तीने ७ हजार रुपये रोख काढुन घेवुन पळुन गेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.पी.शिंदे ९९२२९५५४७० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे २२१/१९,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | हरुन शेख,वय-५७ वर्षे,रा.सैय्यदनगर,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०३/२०१९ रोजी सकाळी ०८/३० ते दि.०१/०४/२०१९ रोजी सकाळी ०९/३० वा.चे दरम्यान गल्ली नं.२,बी,हांडेवाडी रोड हडपसर,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख १ लाख रुपये व सोन्याचे दागिने असा एकुण २,१०,०००/- रु किंमतीचे किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. व्हि.व्हि.पोतदार ८८८८८४३८९६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतंःश्रृंगी पो स्टे ३३९/१९,भादविक ३५३,३३२,१४३,१४७,१४९,४२७ |
| **फिर्यादी** | भुरसिंह राजुपत,वय-५५ वर्षे,रा. विनायकनगर,नवी सांगवी,पुणे |
| **आरोपी** | एकुण पाच इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०४/२०१९ रोजी सकाळी ११/१५ वा.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासना रि फॅक्टरी भोजनालय,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पुणे विद्यापीठ येथे सुरक्षारक्षक प्रमुख असुन,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनाने रि फॅक्टरी भोजनालय येथे फिर्यादी व महाराष्ट्र सिक्युरीटी फोर्सचे कर्मचारी यांचेसह सरकारी काम करीत असताना फिर्यादी हे ओळखत असलेले विद्यार्थी यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनाने रि फॅक्टरी भोजनालय येथील लागु केलेल्या नियमाविरूध्द कोणतीही पुर्व परवानगी न घेता, बेकायदेशीर जमाव जमवून,घोषणाबाजी करून,गोंधळ घालुन ते भोजनालया मध्ये आंत शिरकाव करीत असताना,फिर्यादी यांनी त्यांना अटकाव केला असता,त्यांनी फिर्यादी व महाराष्ट्र सिक्युरीटीचे गार्ड केंचप्पा खांडेकर, किरण माने, अशोक परभने यांना धक्का-बुक्की व मारहाण केली. त्यामध्ये फिर्यादी यांचे उजवे हाताचे अंगठया जवळील बोटास जखम झाली आहे. तसेच महिला कर्मचारी यांना सुध्दा धक्का-बुक्की करून,रि फॅक्टरी चा दरवाजा तोडून, खिडक्यांच्या काचा फोडून नुकसान करून,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी काम करण्यास अडथळा केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.ए.केंजळे ९०११११३९१०० |

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** डेक्कन पो स्टे १२०/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड)

**फिर्यादी** एक महिला,वय-२० वर्षे,रा.कर्वे रोड,पुणे.

**आरोपी** अज्ञात मोबाईल, बँकेचा खातेधारक व वेबसाईटधारक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०१/०२/२०१९ रोजी १५/०० वा.ते दिं.०७/०२/२०१९ वा. पर्यत एसएनडीटी होस्टेल कर्वे रोड,पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील नमुद अज्ञात मोबाईलधारकाने वेबसाईटवरुन व त्याचे मोबाईलवरुन फिर्यादीस फोन करुन त्यांना नोकरी लावण्याचे अमीष दाखवुन,त्याचे बँकेचे खात्यावर वेळोवेळी` २१,८००/- रुपये भरण्यास लावुन त्यांची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** वरिष्ठ पो.निरी. दिपक लगड ९८२३३८२३३३

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोरेगांव पार्क पो स्टे १५१/१९,भादविक ४२०,४०६,३४

**फिर्यादी** एक महिला,वय-३५ वर्षे,रा.कल्याणीनगर,पुणे

**आरोपी** प्रॉपर्टीज प्रा.लिमी.बंडगार्डन रोड,पुणे या कंपनीचे संचालक व त्यांची पत्नी (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१२/०२/२०१६ ते आजपर्यंत शिवतारा प्रॉपर्टीज प्रा.लिमी. कॅनोट प्लेस बिल्डिंग,पहिला मजला,बंडगार्डन रोड,पुणे या ठिकाणी

**तपशिल** यातील फिर्यादी हया येरवडा,पुणे येथील खाजगी कंपनीमध्ये टेक्नीकल आर्किटेक्ट म्हणून नोकरीस आहे. त्यांचे पती यांची बावधान,पुणे येथे इंडस्ट्रीज कंपनी असुन,त्यांचे पती हे सीव्हील कॉट्रॅक्टर म्हणूनही व्यवसाय करतात. नमुद वेळी व ठिकाणी प्रॉपर्टीज प्रा.लिमी.चे संचालक व त्यांची पत्नी यांनी संगनमत करून,फिर्यादी यांचे बरोबर असलेल्या ओळखीतुन त्यांचे कंपनीमध्ये एका वर्षात गुंतवणुक केलेल्या रकमेवर ५० टक्के फायदा असे आमिष दाखवून,फिर्यादी व त्यांचे पतीचा विश्वास संपादन करून,फिर्यादी यांनी स्वतः १ कोटी ८ लाख व त्यांचे पतीने ६२ लाख रूपये तसेच त्यांची इंडस्ट्रीज कंपनीचे ६ लाख अशी रक्कम गुंतवणूक केली असता,त्याचे एका वर्षात ५० टक्के व ३६ टक्के फायदया प्रमाणे आजपर्यंत ४ कोटी ३० लाख ४४ हजार रूपये एवढी व फिर्यादी यांचे पती यांनी त्यांचे वेग-वेगळया साईटवरील सिव्हील काँट्रॅक्टर म्हणुन केलेल्या कामाचे २३ लाख रूपये असे सर्व मिळुन एकुण ४ कोटी ५३ लाख ४४ हजार रूपयेची आर्थिक फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** वरिष्ठ पो.निरी. एम.के.बहादरपुरे ९८२२४०३८६६

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** अलंकार पो स्टे ८६/१९,भादविक ४२०

**फिर्यादी** एक इसम,वय-३२ वर्षे,रा.भुमकर चौक,न-हे,पुणे

**आरोपी** Elysium business and travel management pvt ltd. /kyriad co-rporate (opc) pvt.ltd या कंपनीचे मालक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०८/१२/२०१८ रोजी सध्यांकाळी ०६/००वा. ऑफीस नं १०२,चिंतांमणी प्राईड,सीटी प्राईड जवळ,कोथरुड,पुणे

**तपशिल** Elysium business and travel management pvt ltd. /kyriad co-rporate (opc) pvt.ltd. या कंपनीने फिर्यादी यांना आमचे कंपनीतर्फे तुम्हाला हॉलीडे पॅकेज देवु, प्रवासा मध्ये सुट देवु, तसेच जीमचे कुपन,फंक्शन हॉल मध्ये सवलती देवु असे खोटे आमिष दाखवुन,फिर्यादी यांचे कडुन पॉलीसीची एकुण ९९,०००/- रुपये मंथली इएमआय मध्ये बिनव्याजी असेल असे सांगुन पैसे भरुन घेतल्यामुळे फिर्यादी यांना पॉलीसी मध्ये गडबड वाटल्याने त्यांनी ती रदद करावयाची असल्याने,त्यांनी ती पॉलीसी रदद न करता,फिर्यादी यांचे ९५,८५४/- रुपये इतकी भरलेली रक्कम परत न देता,फिर्यादी यांची अर्थिक फसवणुक केली आहे.

त्याचप्रमाणे कंपनीचे नाव त्यांनी Elysium business and travel management pvt ltdkyriad co-rporate (opc) pvt.ltd असे असताना,त्यांनी दि.०४/०३/२०१८ रोजी कंपनीचे नावामध्ये परस्पर बदल करुन kyriad co-rporate (opc)pvt.ltd असे केले असल्याचे फिर्यादी यांना समजले आहे. त्यामुळे माझी फसवणुक झाली आहे

**त.अंमलदार** पो.उप.निरी. व्हि.एम.अडकुर ९७६५५४२७३३

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**